# राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा रुग्णालय, अलिबाग

## थेट मुलाखत

(दिनांक२५/३/२०२१)

आयुष कार्यक्रमांतर्गत मंजूर असलेली पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने भरणेकरीता खाली नमूद केलेल्या अटी व शर्ती च्या अधीन राहून थेट मुलाखती दि.२५/३/२०२१ रोजी आयोजित करण्यात येत आहेत. त्यानुसार रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ. क्र. | पदाचे नांव | सामाजिक आरक्षण | एकुण पदे | शैक्षणिक अर्हता | अनुभव | मानधन | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Ayush Medical Officer (UG) | भजवं -१<br>विजाअ-१<br>खुला - १ | ३ | १. पदवीधर -आयुष बी.ए.एम.एस.<br>२.संबंधित मेडिकल कौन्सिलचे पर्मनन्ट रजिस्ट्रेशन व त्याचे नुतनीकरण प्रमाणपत्र आवश्यक | 2 years Experience in AYUSH Hospital | 28,000/ | १)उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन,<br>२) ग्रामीण रुग्णालय पोलादपूर<br>३) ग्रामीण रुग्णालय महाड |
| 2 | Ayush Medical Officer (PG) | अ.ज - १<br>इमाव -१<br>खुला - १ | ३ | १. पदव्युत्तर - आयुष (प्रत्येकी १)<br>1) MD/MS-B.A.M.S<br>2) MD, BHMS<br>3) MD, BUMS<br>२. संबंधित मेडिकल काउन्सिलचे पर्मनन्ट रजिस्ट्रेशन व त्याचे नुतनीकरण प्रमाणपत्र आवश्यक | 2 years Experience in AYUSH Hospital | 30000/- | जिल्हा रुग्णालय अलिबाग |

❖ *अटी व शर्ती -*

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती दि. ०५/११/२०२१ पर्यंत राहील. मुलाखतीच्या दिवशी वर नमूद दोन्ही पदांसाठी सकाळी १०.०० ते १२.०० वाजेपर्यंतच उमेदवारांकडून अर्ज स्विकारले जातील. तद्नंतर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही.

२) जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा व उमेदवाराची निवड झालेनंतर नियुक्ती आदेश प्राप्त झालेनंतर उमेदवाराने जिल्हा शल्यचिकित्सकांचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल याशिवाय निवड झालेनंतर संबधित पदावर हजर होताना उमेदवाराने वर्तणूकीचा दाखला सादर करणे बंधनकारक असेल.

४) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

५) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.

६) जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो. सदर बाबतचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी रा.जि.प. अलिबाग यांनी राखून ठेवले आहेत.

७) मुलाखतीस उपस्थित राहताना उमेदवारास एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करणे बंधनकारक राहील.

८) निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच निवड यादी राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा रुग्णालय, अलिबाग यांचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेत येईल याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

९) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार अर्जाची छाननी करुन गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येवुन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. तसेच मेरिट लिस्ट तयार करताना पात्र उमेदवारांच्या आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या अंतिम वर्षाचे गुण + उच्च शैक्षणिक अर्हतेचे गुण + NHM, शासकिय संस्था, विभाग, शासन अंगीकृत संस्था यांचा अनुभव या बाबींचे गुण एकत्र करुन गुणवत्ता यादी तयार करणेत येईल.

Scanned with CamScanner

१०) अ.क्र. १ व २ पदांकरीता कौशल्य चाचणी अनिवार्य करणेत आलेली आहे त्या पदांकरीता पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यापुर्वी त्यांची जिल्हा स्तरावर कौशल्य चाचणी घेण्यात येईल. व सदर चाचणी मध्ये उमेदवार पात्र ठरलेनंतर त्यास नियुक्ती आदेश देण्यात येतील. कौशल्य चाचणी मध्ये उमेदवार अपात्र ठरल्यास पुढील पात्र उमेदवारास कौशल्य चाचणी करीता बोलावण्यात येईल.

११) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडील पत्र क्र. राआसोम/पदभरती/११६८२-७९२/२०२० दि.२१/०५/२०२० मधील मार्गदर्शक सुचनांनुसार जाहिरातीत नमुद केलेल्या विशिष्ट मागास प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर गुणानुक्रमे सर्वात वर असणाऱ्या इतर कोणत्याही मागास प्रवर्गाच्या उमेदवाराची निवड करणेत येईल एकही मागास प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध नसलेस खुल्या प्रवर्गातील उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड करणेत येईल.

१२) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रदद् करणे/ पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

१३) वयोमर्यादा :- १८ वर्षे वय पूर्ण करीत असलेले उमेदवार अर्ज करु शकतात. अभियान अंतर्गत सेवाप्रवेशाची कमाल वयोमर्यादा खुला प्रवर्ग ३८ वर्ष, राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहील. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारांकरिता कमाल सेवा प्रवेश ५ वर्षापर्यंत शिथिल राहील तसेच अ. क्र. १ पदाकरीता वयोमर्यादा ६५ वर्षे व अ.क्र. २ पदाकरीता ७० वर्षे राहिल.

१४) मुलाखतीसाठी उमेदवारांनी जिल्हा प्रशिक्षण केंद्र, जिल्हा रुग्णालय अलिबाग येथे दिनांक २५/३/२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता उपस्थित रहावे. जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्येच अर्ज सादर करावेत. खाली नमुद आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे - १) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे २) संबंधित पदाकरीता तत्सम कौन्सिलचे महाराष्ट्र राज्याचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. ३)शाळा सोडल्याचा दाखला / जन्मतारखेचा दाखला ४)अनुभवाची प्रमाणपत्रे ५) पासपोर्ट आकाराचे २ फोटो ६) जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र ६) वयाबाबतचा पुरावा

१५) उमेदवाराच्या नावात बदल झाला असलेस त्याबाबतचे शासनाचे राजपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१६) जाहिरातीत नमुद वैद्यकिय अधिकार पदांकरीता भरती प्रक्रिये मध्ये उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्रत्येक महिन्याच्या दि.१५ व दि.३० तारखेस कौशल्य चाचणी व मुलाखती आयोजित करणेत येतील याची नोंद घ्यावी. याबाबत पुनःश्च वर्तमानपत्रांत जाहिरात प्रसिध्द केली जाणार नाही. सदर पदांकरीता उमेदवारांनी अर्ज चौथा मजला, राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, रायगड जिल्हा परिषद अलिबाग येथे सादर करावेत

१७) याशिवाय नियुक्ती आदेश स्विकारताना उमेदवारांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या सर्व शैक्षणिक व इतर कागदपत्रांच्या मुळप्रती सादर करणे बंधनकारक राहील.

दिनांक :- १२/०३/२०२१
ठिकाण :- जिल्हा रुग्णालय, अलिबाग

सदस्य सचिव
निवड समिती
तथा,
जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

सदस्य 12/3/2021
निवड समिती
तथा,
जिल्हा शल्यचिकित्सक,
जिल्हा रुग्णालय, अलिबाग

डॉ.किरण पाटील, (भा.प्र.से.)
अध्यक्ष,निवड समिती
तथा,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.

Scanned with CamScanner